कोष्टकांशी सुसंगती साधण्यासाठी आलेख संबंधित
कोष्टकांच्या डाव्या बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक - ५.०७

## मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता



# विभाग " ब "

प्रकरण ५ च्या विभाग " अ " विभागामध्ये शिक्षकांनी प्रश्नावलीद्वारे दिलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन केले असून या विभाग " ब " मध्ये मुख्याध्यापकांनी प्रश्नावलीद्वारे दिलेल्या माहितीचे पृथक्क रण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

## ५.४ अ. मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन :-

प्रश्नावलीत पहिल्या " अ " विभागात मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहित्यांच्या संदर्भात प्रश्न विचारले होते. ( प्रश्न क्रमांक १ ) संपूर्ण नाव, ( प्रश्न क्रमांक २ ) पुरुष / स्त्री, ( प्रश्न क्रमांक ३ ) वय, ( प्रश्न क्रमांक ४ ) शाळेचे नाव केंद्र व पत्ता, ( प्रश्न क्रमांक ५ ) शैक्षणिक पात्रता, ( प्रश्न क्रमांक ६ ) व्यावसायिक पात्रता, ( प्रश्न क्रमांक ७ ) क्षमताधिष्ठित इयत्ता शिकविलेली वर्षे, प्रश्नावलीतील या प्रश्नांच्या आधारे प्राप्त माहिती या ठिकाणी दिलेली असून मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट " ड " मध्ये दिली आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ५ व ६ मध्ये शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता विचारली होती. याबाबतचा मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५१ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५१**

**मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता**

| अ. नं. | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एस्. एस्. सी., डी. एड्. | ११ | ४५.८३% |
| २. | एच्. एस्. सी., डी. एड्. | ०० | ०% |
| ३. | पदवीधर बी. ए., डी. एड्. | ०१ | ०४.१६% |
| ४. | पदवीधर बी. ए., बी. एड्. / बी. पी. एड्. | ०२ | ०८.३३% |
| ५. | पदव्युत्तर एम्. ए. , बी. एड्. | ०२ | ०८.३३% |
| ६. | पदव्युत्तर एम्. ए., एम्. एड्. | ०१ | ०४.१६% |
| ७. | पदव्युत्तर एम्. ए. , डी. एड्. | ०० | ०% |
| ८. | ज्युनि. पी. टी. सी. | ०५ | २०.८३% |
| ९. | सिनि. पी. टी. सी. | ०२ | ०८.३३% |

कोष्टक क्रमांक - ५.५१ वरुन असे दिसून येते की, किमान शैक्षणिक पात्रता ' एस्. एस्. सी., डी. एड्. ' असणारे मुख्याध्यापक ४५.८३% असून एच्.एस्. सी. , डी. एड्. मुख्याध्यापक ०% आढळून आले. तसेच ' पदवीधर बी.ए., बी. एड्. / बी. पी. एड्., ' ' पदव्युत्तर एम्. ए., बी. एड्.' व ' सिनि. पी. टी. सी. ' यांचे प्रमाण ८.३३% एवढे प्रमाण दिसून येते.

१२.४९% मुख्याध्यापक पदवीधर असून २९.१६% मुख्याध्यापक ज्युनि. पी. टी. सी. व सिनि. पी. टी. सी. असून १२.४९% मुख्याध्यापक पदव्युत्तर आहेत. ७५.००% मुख्याध्यापक पदव्युत्तर नाहीत.

यावरुन संशोधकास असे वाटते की, मुख्याध्यापकानी आपली शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरी मुख्याध्यापकांनी आपली व्यावसायिक उंची व शैक्षणिक पात्रता वाढविण्याचा प्रयत्न करावा. असे जरी असले तरी किमान शैक्षणिक पात्रता सर्व मुख्याध्यापकांची आहे.

### ५.५ ब. क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापना बाबतचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ८ मध्ये मुख्याध्यापक या पदाचा प्रशिक्षण कोर्स झाला आहे का ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५२ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५२**

**मुख्याध्यापक पदाच्या प्रशिक्षण कोर्स बाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | १३ | ५४.१६% |
| २. | नाही. | ११ | ३४.८३% |

कोष्टक क्रमांक - ५.५२ वरुन असे दिसून येते की, मुख्याध्यापक या पदाचा कोर्स झालेल्या मुख्याध्यापकांची संख्या १३ म्हणजे ५४.१६% प्रतिसाद दिसून आला. व ४५.८३% शिक्षकांचा प्रशिक्षण कोर्स झाला नाही. तरी शासनाच्या धोरणानुसार मुख्याध्यापकांचा कोर्स लवकरात लवकर पूर्ण करुन मुख्याध्यापकांनी आपली व्यावसायिक उंची वाढवावी. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ९ मध्ये मुख्याध्यापक या पदाचा अनुभव किती ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद कोष्टक क्रमांक - ५.५३ मध्ये दर्शविलेला आहे.